Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। गुरुवार, दि. ३० एप्रिल २०२६ । वर्ष १ । अंक २५ । पाने २।

DIGITAL EDITION

धीरेंद्र शास्त्री विरुद्ध श्याम मानव वाद पेटला

(पान २ वर)



» Selected

### तैवानमध्ये पुन्हा चीनची घुसखोरी

**नवी दिल्ली:** चीनने पुन्हा एकदा तैवानच्या हवाई संरक्षण क्षेत्रात आपली लढाऊ विमाने आणि युद्धनौका पाठवून घुसखोरी केल्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर तणाव वाढला आहे. चीनच्या या हालचालींमुळे दोन्ही देशांमधील संघर्षाची स्थिती अधिक गंभीर झाली असून, तैवानने आपल्या सीमांवर कडक निगराणी ठेवण्यास सुरुवात केली आहे.

### पंतप्रधान मोदी यांचे फिफाकडून कौतुक

**नवी दिल्ली:** फिफाचे अध्यक्ष जियानी इन्फँटिनो यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या क्रीडा क्षेत्रातील उत्साहाचे आणि प्रेमाचे जाहीर कौतुक केले आहे. मोदी सरकारने भारतात फुटबॉलसह सर्वच खेळांच्या विकासासाठी घेतलेल्या पुढाकारामुळे देशात क्रीडा संस्कृती अधिक प्रबळ होत असल्याचे मत त्यांनी एका अधिकृत निवेदनात व्यक्त केले आहे.

## लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये 'डॉ. आंबेडकर अध्यासन' स्थापन करण्याचा

# सातासमुद्रापार बाबासाहेबांच्या विचारांचा जागर!

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या प्रस्तावाला मंजुरी

मुकुंदराव नंन्नवरे
जन सम्राट टाईम्स

**मुंबई । भारतीय संविधानाचे शिल्पकार, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आणि कार्याचा गौरव आता जागतिक स्तरावर अधिक प्रकर्षाने होणार आहे. राज्य शासनाने 'सामाजिक समता व समरसता वर्षा'निमित्त लंडन येथील जगप्रसिद्ध 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्स' (एलएसई) या संस्थेत कायमस्वरूपी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन' (स्टडी चेअर) स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.**

**अध्यासन केंद्राची वैशिष्ट्ये आणि फायदा**

* जागतिक व्यासपीठ: ज्या संस्थेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण घेतले, तिथेच त्यांच्या नावाने अध्यासन केंद्र सुरू होणे, ही तमाम आंबेडकरी अनुयायांसाठी अभिमानाची बाब आहे.
* डॉक्टरेट शिष्यवृत्ती: या कायमस्वरूपी अध्यासनाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विशेष शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे.
* संशोधनाला चालना: याद्वारे दलित, वंचित आणि शोषित घटकांच्या उत्थानासाठी बाबासाहेबांनी मांडलेल्या आर्थिक आणि राजकीय सिद्धांतांवर जागतिक स्तरावर संशोधन करणे सुलभ होईल.



**मंत्रिमंडळ बैठकीतील इतर महत्त्वाचे निर्णय**

* राज्याचे 'एआय' धोरण जाहीर तंत्रज्ञान क्षेत्रात क्रांती घडवण्यासाठी नवीन एआय धोरणाला मंजुरी. याद्वारे १० हजार कोटींची गुंतवणूक आणि १.५ लाख रोजगारांची निर्मिती होणार आहे.
* हरित महाराष्ट्र आयोग: पर्यावरणाचे रक्षण आणि शाश्वत विकासासाठी स्वतंत्र आयोगाची स्थापना करण्यात आली आहे.
* दिव्यांगांसाठी शिष्यवृत्ती: दिव्यांग विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाला बळ देण्यासाठी नवीन शिष्यवृत्ती योजना राबवण्यात येणार आहे.
* मॅजेस्टिक प्रकल्प: जागतिक बँकेच्या मदतीने राज्यातील वीज पारेषण क्षमता सुधारण्यासाठी आणि हरित ऊर्जेला चालना देण्यासाठी नवीन प्रकल्प सुरू होणार आहे.
* रत्नागिरीत केंद्रीय विद्यालय: रत्नागिरी जिल्ह्यातील नाचणे येथे नवीन केंद्रीय विद्यालय उभारण्यासाठी जमीन देण्यास मंजुरी देण्यात आली.
* आश्रमशाळा कर्मचाऱ्यांना लाभ: शासकीय आश्रमशाळांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

एकूणच बुधवारच्या बैठकीतील मंत्रिमंडळ निर्णय म्हणजे केवळ विकासाचा अजेंडा नसून, तो सामाजिक न्यायाचा आणि महापुरुषांच्या वारशाचा जागतिक स्तरावर सन्मान करणारा ऐतिहासिक पाऊल ठरला आहे.

लंडनमधील हे अध्यासन केंद्र भविष्यात भारतीय विचारवंतांसाठी ज्ञानाचे ऊर्जाकेंद्र ठरेल.



जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज | ज

## मे महिन्यात १३ दिवस बँका बंद

### कामाचे नियोजन वेळेत करा; पाहा सुट्ट्यांची संपूर्ण यादी

जन सम्राट टाईम्स

**मुंबई :** एप्रिल महिना संपायला अवघ्या काही तासांचा अवधी उरला असून उद्यापासून मे महिन्याला सुरुवात होत आहे. जर तुम्हाला मे महिन्यात बँकेत जाऊन काही महत्त्वाची कामे करायची असतील, तर ही बातमी तुमच्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या (सर्व) कॅलेंडरनुसार, मे २०२६ मध्ये रविवार आणि शनिवारच्या सुट्ट्यांसह विविध राज्यांतील सण आणि महोत्सवांमुळे एकूण १३ दिवस बँकांचे कामकाज बंद राहणार आहे. यामध्ये साप्ताहिक सुट्ट्यांसह महाराष्ट्र दिन, बुद्ध पौर्णिमा आणि बकरी ईद यांसारख्या मोठ्या सुट्ट्यांचा समावेश आहे. महाराष्ट्रात १ मे रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त सार्वजनिक सुट्टी असल्याने बँकांचे कामकाज बंद राहील. तसेच ९ मे आणि २३ मे या शनिवारी आणि सर्व रविवारी बँका बंद राहतील. बकरी ईदची सुट्टी २७ मे रोजी असण्याची शक्यता आहे, जी चंद्राच्या दर्शनावर अवलंबून असेल. **महत्त्वाची सूचना:** यातील काही सुट्ट्या प्रादेशिक स्वरूपाच्या असल्याने, वेगवेगळ्या राज्यांनुसार सुट्ट्यांच्या तारखा बदलू शकतात. त्यामुळे आपल्या बँकेच्या स्थानिक शाखेत किंवा आरबीआयच्या अधिकृत वेबसाईटवर खात्री करूनच बँकेत जाण्याचे नियोजन करावे.

2026
MAY

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

shutterstock
www.shutterstock.com · 2652974417

**मे 2026 मधील बँक सुट्ट्यांची यादी**

* १ मे (शुक्रवार): महाराष्ट्र दिन / कामगार दिन / बुद्ध पौर्णिमा (महाराष्ट्र आणि बहुतांश राज्यांत बँका बंद)
* ३ मे (रविवार): साप्ताहिक सुट्टी
* ९ मे (शनिवार): महिन्याचा दुसरा शनिवार (बँक सुट्टी)
* १० मे (रविवार): साप्ताहिक सुट्टी
* १६ मे (शनिवार): सिक्कीम राज्य स्थापना दिन (केवळ सिक्कीममध्ये सुट्टी)
* १७ मे (रविवार): साप्ताहिक सुट्टी
* २३ मे (शनिवार): महिन्याचा चौथा शनिवार (बँक सुट्टी)
* २४ मे (रविवार): साप्ताहिक सुट्टी
* २६ मे (मंगळवार): काझी नझरुल इस्लाम जयंती (त्रिपुरामध्ये प्रादेशिक सुट्टी)
* २७ मे (बुधवार): बकरी ईद / ईद-उल-अधा (देशभरात बहुतांश ठिकाणी बँका बंद)
* २८ मे (गुरुवार): बकरी ईद (दुसरा दिवस - जम्मू-काश्मीर आणि पुद्दुचेरीमध्ये सुट्टी)
* ३१ मे (रविवार): साप्ताहिक सुट्टी

# २०२१ मधील 'बंगाल'च्या निकालांनी खोटे ठरवले होते एक्झिट पोल्स!

### पश्चिम बंगालमधील एक्झिट पोल्सच्या विश्वासार्हतेवर मोठे प्रश्नचिन्ह

जन सम्राट टाईम्स

**कोलकाता/फालता | प्रतिनिधी**
पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांचे एक्झिट पोल जाहीर झाले असतानाच, २०२१ मधील एक्झिट पोल्सच्या अचूकतेबाबत पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. विशेषतः पश्चिम बंगालमध्ये मागील वेळी एक्झिट पोल्सचे अंदाज कसे चुकले होते, यावर चर्चा सुरू झाली आहे. बंगालमधील मतदान संपताच पाच राज्यांचे एक्झिट पोल्स समोर आल्यानंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. मात्र, २०२१ च्या विधानसभा निवडणुकांचा अनुभव पाहता, पश्चिम बंगालमधील एक्झिट पोल्सच्या विश्वासार्हतेवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. तामिळनाडू आणि आसाममध्ये अचूक ठरणारे एक्झिट पोल्स बंगालमध्ये मात्र पूर्णपणे अपयशी ठरले होते, हा इतिहास आहे. २०२१ मध्ये बहुतांश एक्झिट पोल्सनी पश्चिम बंगालमध्ये भाजप आणि तृणमूल काँग्रेसमध्ये 'कांटे की टक्कर' वर्तवली होती.

काही पोल्सनी तर भाजपला स्पष्ट बहुमत किंवा तृणमूलपेक्षा जास्त जागा मिळतील, असे भाकीत केले होते. प्रत्यक्षात मात्र घडले भलतेच! २ मे २०२१ रोजी जेव्हा निकाल लागले, तेव्हा ममता बॅनर्जींच्या तृणमूल काँग्रेसने २१३ जागा जिंकून प्रचंड बहुमतासह सत्ता राखली. भाजपला केवळ ७७ जागांवर समाधान मानावे लागले. बहुतांश 'पोलस्टर्स'चा बंगालमधील कल पूर्णपणे चुकीचा ठरला होता.



**तामिळनाडू आणि आसाम: अचूकतेचा पॅटर्न**

* तामिळनाडू: २०२१ मध्ये पोल्सनी द्रमुक (डीएमके) आघाडीच्या विजयाचा अंदाज दिला होता, जो तंतोतंत खरा ठरला. एम. के. स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखाली द्रमुकने मोठी आघाडी घेतली.
* आसाम: आसाममध्ये भाजप पुन्हा सत्तेत येईल, हे एक्झिट पोल्सनी स्पष्टपणे सांगितले होते आणि निकालही तसेच लागले. हेमंत बिस्वा सरमा यांच्या नेतृत्वाखाली भाजपने सत्ता राखली.

**केरळ: थोड्या फरकाने अचूक**

* एलडीएफचे पुनरागमन: केरळमध्ये एलडीएफ पुन्हा सत्तेत येईल, असा कल पोल्सनी दिला होता. जरी जागांच्या आकडेवारीमध्ये थोडा फरक होता, तरीही सत्तेचा कल ओळखण्यात पोलस्टर्सना यश आले होते.

**२०२६ च्या निकालांबाबत साशंकता का?**

२९ एप्रिल रोजी जाहीर झालेल्या एक्झिट पोल्समध्ये बंगालमध्ये भाजपला आघाडी मिळताना दिसत आहे. मात्र, २०२१ चा इतिहास पाहता राजकीय विश्लेषक सावध भूमिका घेत आहेत -
* मतदारांचे मौन: बंगालमध्ये मतदार अनेकदा आपली भूमिका स्पष्टपणे सांगत नाहीत (सायलेंट व्होटर्स), ज्यामुळे एक्झिट पोल्सची आकडेवारी चुकण्याची शक्यता असते.
* वाढलेला संघर्ष: २०२६ मध्येही चुरस मोठी असल्याने, २०२१ प्रमाणेच निकाल धक्कादायक लागतील की पोल्स यावेळी अचूक ठरतील, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. एकूणच, तामिळनाडू आणि आसाममध्ये एक्झिट पोल्स विश्वासार्ह मानले जात असले, तरी 'पश्चिम बंगाल' हे पोलस्टर्ससाठी नेहमीच एक आव्हान राहिले आहे. त्यामुळेच, ४ मे २०२६ रोजी लागणाऱ्या अधिकृत निकालापर्यंत बंगालमधील सत्तेचा पेच कायम राहण्याची चिन्हे आहेत.

## पश्चिम बंगालमध्ये स्वातंत्र्यानंतरचे सर्वाधिक ९१.९४ टक्के मतदान!

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली | प्रतिनिधी**
निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, पश्चिम बंगालमध्ये निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात ९१.८०% मतदारांनी मतदान केले. स्वातंत्र्यानंतरचे राज्यातील हे सर्वाधिक मतदान ठरले आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी स्वातंत्र्यानंतरच्या आतापर्यंतच्या या सर्वाधिक आकडेवारीचे कौतुक केले. दरम्यान, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी त्यांच्या मतदारसंघात सीआरपीएफच्या जवानांनी मतदारांवर हल्ला केल्याचा आरोप केला आहे. पश्चिम बंगालचे मुख्य निवडणूक अधिकारी (सीईओ) मनोज अग्रवाल यांनी बुधवारी सांगितले की, ज्या मतदान केंद्रांवर ईव्हीएममध्ये छेडछाड झाल्याचे आढळेल, तिथे फेरमतदान जाहीर होण्याची शक्यता आहे. निश्चित केल्यानंतर, विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) हा या निवडणुकीत एक अत्यंत राजकीयदृष्ट्या संवेदनशील मुद्दा म्हणून समोर आला आहे.

## ट्रम्प यांच्याकडून 'विजया'च्या घोषणेची तयारी!

जन सम्राट टाईम्स

**वॉशिंग्टन/तेहरान| प्रतिनिधी**
इराण आणि अमेरिका यांच्यातील संघर्ष आता एका निर्णायक वळणावर येऊन पोहोचला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प युद्धाच्या ओझ्यातून बाहेर पडण्यासाठी कोणत्याही कराराशिवाय 'विजयाची घोषणा' करण्याच्या तयारीत असल्याचे संकेत मिळत आहेत. अमेरिका 'एक्झिट' रणनीतीनुसार, लवकरच विजयाची घोषणा करण्याची शक्यता आहे. व्हाईट हाऊस सध्या सुरू असलेल्या युद्धाला एक आर्थिक आणि लष्करी 'ओझे' मानत आहे. त्यामुळे, इराणशी कोणताही अणू करार न करताही अमेरिका स्वतःचा विजय घोषित करण्याची शक्यता आहे. अमेरिकन गुप्तचर संस्था सीआयए सध्या यावर काम करत आहे की, जर अमेरिकेने एकतर्फी विजय घोषित केला, तर इराणची त्यावर काय प्रतिक्रिया असेल? जागतिक स्तरावर नाचक्की टाळण्यासाठी अमेरिका सध्या सावध पावले उचलत आहे. अमेरिका युद्धातून सन्मानजनक बाहेर पडण्याचा मार्ग शोधत असली, तरी जमिनीवर मात्र इराणची आर्थिक स्थिती खालावली असून लष्करी तणाव दिवसेंदिवस वाढत आहे. ट्रम्प यांचा इशारा आणि दीर्घकालीन नाकेबंदी * "शहाणे व्हा" - ट्रम्प: राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी इराणला कडक शब्दांत ताकीद दिली आहे. रखडलेल्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर त्यांनी म्हटले आहे की, "इराणने आता शहाणपणाने वागण्याची वेळ आली आहे." * नौदल नाकेबंदी: ट्रम्प यांनी इराणवर दीर्घकालीन नाकेबंदी (ब्लॉकेड) करण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे इराणच्या व्यापारी हालचालींवर मर्यादा आल्या आहेत.

लष्करी इशारा: अमेरिकेकडून इराणशी संबंधित जहाजे जप्त केली जात असल्याने, इराणने 'अभूतपूर्व लष्करी कारवाई' करण्याची धमकी दिली आहे.
* सायबर हल्ला: इराणी हॅकर्सनी अमेरिकेच्या साधारण २,००० मरीन सैनिकांचा गोपनीय डेटा लीक करून नवीन 'सायबर युद्ध' छेडले आहे. कोसळलेले चलन: अमेरिकेच्या नौदल नाकेबंदीमुळे इराणचा 'रियाल' विक्रमी नीचांकी पातळीवर पोहोचला आहे. सध्या १ अमेरिकन डॉलरचे मूल्य तब्बल १८ लाख इराणी रियाल इतके झाले

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज | ज

# सामान्य माणसाचे जीवन बदलणारं 'स्मार्ट' पाऊल!

## महाराष्ट्राचे 'एआय' धोरण: जाणून घ्या काय आहे सरकारचा मेगा प्लॅन?

विक्रांत पाटील
जन सम्राट टाईम्स

**मुंबई : आजच्या धावपळीच्या युगात 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' (एआय) म्हणजे केवळ 'रोबोट' नाही, तर ती एक अशी शक्ती आहे, जी आपले जीवन अधिक सोपे, वेगवान आणि पारदर्शक बनवू शकते. याच हेतूने महाराष्ट्र सरकारने २९ एप्रिल २०२६ रोजी राज्याचे नवीन 'एआय धोरण' जाहीर केले आहे.**

हे धोरण केवळ तंत्रज्ञानापुरते मर्यादित नसून, ते राज्याच्या प्रगतीची नवी गुरुकिल्ली ठरणार आहे. या एआय धोरणाची गरज काय होती, असा प्रश्न सर्वसामान्यांना पडू शकतो. मात्र, जग वेगाने बदलत आहे. जर आपण तंत्रज्ञानाचा स्वीकार केला नाही, तर आपण स्पर्धेत मागे पडू. प्रशासनातील विलंब टाळण्यासाठी, अचूक निर्णय घेण्यासाठी आणि राज्याची अर्थव्यवस्था 'ट्रिलियन डॉलर' बनवण्यासाठी या धोरणाची नितांत गरज होती. थोडक्यात सांगायचे तर, महाराष्ट्राचे एआय धोरण हे केवळ संगणकासाठी नसून, ते सामान्य माणसाच्या जगण्याला गती आणि प्रतिष्ठा देण्यासाठी आहे. यामुळे येणाऱ्या काळात तुमची सरकारी कामे, आरोग्य सुविधा आणि मुलांचे शिक्षण हे अधिक 'स्मार्ट' आणि सोपे होणार आहे! या धोरणाची वैशिष्ट्ये आणि सर्वसामान्यांवर होणारा परिणाम सोप्या भाषेत समजून घेऊया.

**राज्याच्या 'एआय'**



**धोरणाची प्रमुख वैशिष्ट्ये**

* गुंतवणूक आणि रोजगार: या धोरणांतर्गत राज्यात १०,००० कोटी रुपयांहून अधिक गुंतवणुकीचे लक्ष्य असून, दीड लाख नवीन नोकऱ्या निर्माण होतील.
* प्राधान्य क्षेत्रे: आरोग्य, शिक्षण, शेती आणि पायाभूत सुविधा या चार मुख्य क्षेत्रांवर एआयचा विशेष भर असेल.
* फाईल ट्रॅकिंग: एआयमुळे एखादी फाईल कुठे थांबली आहे, हे त्वरित समजेल.
* २४/७ मदतनीस: सरकारी योजनांची माहिती देण्यासाठी प्रगत 'चॅटबॉट्स' असतील, जे लोकांच्या प्रश्नांची उत्तरे स्थानिक भाषेत देतील.
* पारदर्शकता: भ्रष्टाचाराला आळा बसेल, कारण डेटावर आधारित निर्णय घेतले जातील, ज्यात मानवी हस्तक्षेप कमी असेल.

**जनतेला नेमका काय फायदा होणार?**

* शेती (स्मार्ट फार्मिंग): पिकांवरील रोग ओळखणे, हवामानाचा अचूक अंदाज आणि खतांचा योग्य वापर यासाठी एआय शेतकऱ्यांना मार्गदर्शन करेल.
* आरोग्य (हेल्थ टेक): आजारांचे लवकर निदान करण्यासाठी आणि ग्रामीण भागात तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला डिजिटल माध्यमातून देण्यासाठी एआय मदत करेल.
* महसूल: सातबारा, दाखले आणि इतर कागदपत्रे कोणत्याही मानवी हस्तक्षेपाशिवाय त्रुटीमुक्त मिळतील.

**देश आणि जगाचे चित्र काय?**

* भारतात कोण आघाडीवर? देशात तेलंगणा हे एआय धोरण जाहीर करणारे पहिले राज्य ठरले होते. त्यानंतर कर्नाटक, तामिळनाडू आणि उत्तर प्रदेशनेही आपली धोरणे आणली आहेत. मात्र, महाराष्ट्राचे २०२६ चे धोरण हे अधिक 'होलिस्टिक' (सर्वसमावेशक) मानले जात आहे.
* देशाचे धोरण: केंद्र सरकारने 'इंडिया एआय' मिशन सुरू केले आहे, ज्याचा उद्देश भारताला जागतिक एआय हब बनवणे आहे.
* जागतिक स्थिती: अमेरिका आणि चीन एआय क्षेत्रात आघाडीवर आहेत. युरोपीय महासंघाने (ईयु) एआयच्या सुरक्षित वापरासाठी जगातील पहिला एआय कायदा केला आहे.

**'जेन-झी' आणि शिक्षणाचे बदलणारे स्वरूप**

* पर्सनलाइज्ड लर्निंग: शिक्षणात आता 'सर्वांसाठी एकच पद्धत' नसेल. विद्यार्थ्याच्या आवडीनुसार आणि क्षमतेनुसार एआय त्याला शिकवेल.
* नवीन करिअर संधी: डेटा सायंटिस्ट, एआय एथिक्स तज्ज्ञ आणि प्रॉम्प्ट इंजिनिअर्स यांसारख्या नवीन क्षेत्रांत लाखो संधी उपलब्ध होतील.
* कौशल्य विकास: पारंपारिक शिक्षणापेक्षा 'स्किल-बेस्ड' शिक्षणावर भर दिला जाईल.

## निवडणुका संपल्या, आता पेट्रोल-डिझेल महागणार?

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली/कोलकाता| प्रतिनिधी**
पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीचा शेवटचा टप्पा काल, २९ एप्रिल रोजी पार पडला. निवडणुकांचे मतदान संपताच आता सर्वांचे लक्ष इंधन दरांकडे लागले आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे तेल विपणन कंपन्यांना सध्या मोठा आर्थिक फटका सहन करावा लागत असून, आज (गुरुवार) पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत मोठी वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर चढे असतानाही देशांतर्गत बाजारात किमती स्थिर ठेवल्या गेल्या होत्या. यामुळे तेल कंपन्यांना प्रत्येक लिटरमागे मोठा तोटा होत आहे. पेट्रोल सुमारे १४ रुपये प्रति लिटर तर डिझेल सुमारे १८ रुपये प्रति लिटर इतका तोटा कंपन्या सध्या सहन करीत आहेत. भारतात अनेकदा असा ट्रेंड पाहायला मिळाला आहे की, मोठ्या राज्यांच्या निवडणुकांदरम्यान तेल कंपन्या इंधन दर स्थिर ठेवतात. पश्चिम बंगालमधील निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गेल्या काही आठवड्यांपासून दरवाढ रोखून धरण्यात आली होती.

मात्र, आज शेवटच्या टप्प्यातील मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यामुळे, कंपन्या आता हा तोटा भरून काढण्यासाठी दरवाढीचा निर्णय घेऊ शकतात.

आज, ३० एप्रिल पासून तेल कंपन्या टप्प्याटप्प्याने किंवा एकदम मोठी दरवाढ करण्याची शक्यता नाकारता येत नाही. जर कंपन्यांनी त्यांचा संपूर्ण तोटा भरून काढण्याचे ठरवले, तर पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत मोठी झेप पाहायला मिळू शकते. मात्र, महागाईचा विचार करता सरकार कंपन्यांना ही दरवाढ टप्प्याटप्प्याने करण्यास सांगण्याचीही शक्यता आहे.

» Selected

## चार्ल्स यांनी केले नाटोचे समर्थन

**वॉशिंग्टन:** ब्रिटनचे राजे किंग चार्ल्स तिसरे यांनी अमेरिकन काँग्रेसमध्ये ऐतिहासिक भाषण दिले असून, यामध्ये त्यांनी नाटो संघटनेच्या समर्थनासह जागतिक शांततेसाठी मित्रराष्ट्रांच्या महत्त्वावर भर दिला आहे. त्यांनी डोनाल्ड ट्रम्प आणि अमेरिकन जनतेला जुन्या मित्रांची साथ कायम ठेवण्याचे आणि जागतिक आव्हानांना एकत्रितपणे सामोरे जाण्याचे आवाहन केले.

## भाजपचे प्रवेश वाही दिल्लीचे नव्ह महापौर

नवी दिल्ली: दिल्ली महानगरपालिकेला बुधवारी नवा महापौर मिळाला. या निवडणुकीत भाजपचे उमेदवार प्रवेश वाही यांनी विजय मिळवला आहे. या विजयानंतर भाजपच्या गोटात उत्साहाचे वातावरण असून, शहराच्या विकासासाठी आणि नागरी समस्यांच्या निवारणासाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचे नवनियुक्त महापौरांनी स्पष्ट केले.

## रशियाकडून मिळणार नवी हवाई क्षेपणास्त्रे

नवी दिल्ली: रशियाकडून भारताला चौथी एस-४०० हवाई संरक्षण प्रणाली लवकरच प्राप्त होणार आहे. यामुळे भारताची हवाई सुरक्षा अधिक अभेद्य होणार आहेक्षेपणास्त्रे अचूक टिपण्याची क्षमता असलेल्या या यंत्रणेमुळे भारताच्या सीमावर्ती भागातील संरक्षण यंत्रणा अधिक मजबूत होईल.

### रक्तदान शिबिर व सामाजिक उपक्रमांनी वाढदिवस ठरला जनसेवेचा उत्सव

# प्रतापराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त फिरते नेत्रालय सेवेत

## जिल्हाभरातून शुभेच्छांचा वर्षाव; "भावी आमदार" बॅनरमुळे राजकीय चर्चांना उधाण





जन सम्राट टाईम्स

**पाळधी/जळगाव प्रतिनिधी**
"सेवा हेच खरे व्रत" या भावनेतून पालकमंत्री तथा पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, युवा नेते तथा जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील आणि विक्रम पाटील यांच्या पुढाकारातून जीपीएस ग्रुप, पाळधी यांच्या वतीने अत्याधुनिक फिरते नेत्र तपासणी ॲम्बुलन्स जळगाव ग्रामीण भागातील जनतेच्या सेवेत आजपासून दाखल करण्यात आली आहे. या महत्त्वपूर्ण उपक्रमाचा शुभारंभ प्रतापराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त उत्साहात पार पडला. प्रतापराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हाभरातून शुभेच्छांचा अक्षरशः वर्षाव झाला. शासकीय विश्रामगृह, पाळधी येथे सकाळी ८ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत शुभेच्छुकांची मोठी गर्दी उसळली होती. शिवसेनेचे मुख्यानेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदेयांच्यासह आमदार शिवसेनेसह इतर पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला आघाडी तसेच जळगाव ग्रामीण मतदारसंघातील नागरिकांनी प्रत्यक्ष येवून तर काहींनी फांद्वारे शुभेच्छा दिल्या. आधुनिक फिरते नेत्रालय आजपासून जनतेच्या सेवेत : ग्रामीण आरोग्याला नवा प्रकाश

यापूर्वी नेत्र तपासणीसाठी ग्रामीण भागातील रुग्णांना पाळधी येथे यावे लागत होते. मात्र आता ही अत्याधुनिक नेत्र तपासणी ॲम्बुलन्स थेट गावोगावी जाऊन नागरिकांची तपासणी करणार आहे. तपासणीनंतर गरजू रुग्णांना मोफत चष्मे देण्यात येणार असून, ज्यांना शस्त्रक्रियेची गरज आहे अशा रुग्णांना पुढील उपचारासाठी पनवेल येथील अत्याधुनिक रुग्णालयात पाठवण्यात येणार आहे. "गावातच उपचार" ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवणारा हा उपक्रम खऱ्या अर्थाने सर्वसामान्य व गरजूंसाठी "मायेची दृष्टी" ठरणार आहे. आतापर्यंत १७ हजारांपेक्षा अधिक रुग्णांना दृष्टीदान देणाऱ्या या कार्याचा विस्तार आता संपूर्ण जळगाव ग्रामीण भागात होत असल्याने नागरिकांमध्ये समाधानाची भावना व्यक्त होत आहे.

**रक्तदान व सामाजिक उपक्रम**
वाढदिवसानिमित्त विविध





लोकोपयोगी उपक्रम राबवण्यात आले. दोन दिवसांपूर्वी आयोजित भव्य रक्तदान शिबिरात तब्बल ५५ रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडली. याशिवाय गरजू विद्यार्थ्यांना वही, पेन, पेन्सिलचे वाटप, आरोग्य केंद्रात फळवाटप तसेच गरजूंसाठी जेवणाचे आयोजन करण्यात आले. त्यामुळे हा वाढदिवस केवळ उत्सव न राहता "जनसेवेचा उत्सव" ठरला.

**अग्निशमन वाहन व घंटागाडीचे लोकार्पण**
दरम्यान, नशिराबाद नगरपरिषदेला मिळालेल्या आधुनिक अग्निशमन वाहनाचे लोकार्पण तसेच पाळधी बु. ग्रामपंचायतीतर्फे गावाच्या स्वच्छतेसाठी घंटागाडीचे लोकार्पण युवा नेते प्रतापराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. स्वच्छतेच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण मानला जात असून गाव स्वच्छ ठेवण्याच्या चळवळीला आणखी चालना मिळणार आहे. अत्याधुनिक नेत्र तपासणी ॲम्बुलन्स व घंटागाडीचे लोकार्पण प्रतापराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी सरपंच विजय पाटील, शरद कोळी, माजी सभापती सचिन पवार, मुकुंदराव नन्नवरे, अनिल पाटील, उपमहापौर मनोज चौधरी, श्याम कोगटा, उपनगराध्यक्ष विजय महाजन, माजी जिपचे उपाध्यक्ष लालचंद पाटील, नगराध्यक्ष पिंटू पाटील, उपनगराध्यक्ष पंकज महाजन उद्योगपती पती पिंटू कोठारी शरद कसात , गोपाल कासट, तालुका प्रमुख शिवराज पाटील, डी. ओ. पाटील, दिलीप बापू पाटील, बीडीओ किशोर वानखेडे ,ग्राम विकास अधिकारी श्री पाठक, यांच्यासह शिवसेना , इतर पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला आघाडी तसेच जळगाव ग्रामीण मतदारसंघातील पाधाधिकारी व कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प्रतापराव पाटील यांचा भावनिक कोट

"आज माझ्या वाढदिवसानिमित्त मला मिळालेलं जनतेचं प्रेम, आपुलकी आणि आशीर्वाद हे शब्दांत मांडता येणार नाहीत. ही आपुलकी आणि विश्वास माझ्यासाठी खूप मोठी जबाबदारी आहे. माझ्या वाढदिवसाचा खरा आनंद केवळ शुभेच्छांमध्ये नाही, तर जनतेच्या सेवेसाठी काहीतरी चांगलं करण्यामध्ये आहे. प्रत्येक गावात, प्रत्येक घरात आरोग्याची आणि आनंदाची ज्योत पेटवण्याचा माझा प्रयत्न राहील. तुमचं हे प्रेम, विश्वास आणि आशीर्वाद मला आयुष्यभर जनसेवेसाठी प्रेरणा देत राहील—हीच माझ्यासाठी सर्वात मोठी भेट आहे."

**-प्रतापराव पाटील, जिल्हा परिषद सदस्य**

### राजकीय चर्चांना उधाण

जळगाव शहरासह मतदारसंघात "भावी आमदार" अशा उल्लेखाचे बॅनर्स झळकताच प्रतापराव पाटील यांचे नाव राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहे. हा उल्लेख केवळ शुभेच्छांपुरता न राहता जनतेच्या अपेक्षा आणि वाढत्या विश्वासाचे प्रतीक मानला जात आहे. दरम्यान, वाढदिवसानिमित्त जिल्ह्यातील विविध पक्षांचे नगराध्यक्ष, नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य तसेच पंचायत समिती पदाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट घेत शुभेच्छा दिल्या. या भेटीदरम्यान झालेल्या चर्चांमुळे राजकीय वर्तुळात कुतूहल निर्माण झाले असून, अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. त्यामुळे "भावी आमदार" हा उल्लेख आता केवळ बॅनरपुरता मर्यादित न राहता चर्चेचा केंद्रबिंदू ठरताना दिसत आहे.

---

जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईम्स | ब्रेक न्यूज | ज

# धीरेंद्र शास्त्री विरुद्ध श्याम मानव वाद पेटला

## चमत्कार करा ८० लाख मिळवा: श्याम मानव

जन सम्राट टाईम्स



**मुंबई** | मध्यप्रदेशच्या बागेश्वर धामचे बाबा धीरेंद्र शास्त्री हे नागपूरमध्ये रामकथेच्या कार्यक्रमासाठी आलेले आहेत. त्यांच्या दौऱ्यात आधी छत्रपती शिवाजी महाराजांबाबत केलेले विधान वादग्रस्त ठरले. त्यानंतर आता त्यांनी केलेला चमत्काराचा दावा वादाच्या भोवऱ्यात आहे. शंभर दिवस व्हेंटिलेटरवर असलेल्या एका मुलाला स्वतःच्या पायावर उभे केल्याचा दावा करण्यात आला होता.

या दाव्यावर अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे प्रमुख श्याम मानव यांनी यावर आक्षेप घेतला असून चमत्कार सिद्ध करण्याचे आव्हानच धीरेंद्र शास्त्री यांना दिले आहे. टीव्ही ९ वृत्तवाहिनीशी बोलताना श्याम मानव म्हणाले की, धीरेंद्र शास्त्रींनी दुसऱ्यांदा आमच्या आव्हानातून पळ काढला आहे. त्यांच्या दिव्य दरबारा ऐवजी नागपूरच्या पत्रकारसंघासमोर चमत्काराचा प्रयोग करावा. ऐनवेळी धीरेंद्र शास्त्री यांच्यासमोर आम्ही १० माणसे उभी करू. या १० माणसांचे नाव, त्यांच्या वडिलांचे नाव, फोन नंबर धीरेंद्र शास्त्रींनी सांगायचा आहे. हे दावे त्यांनी दिव्य दरबारमध्ये आधीच केलेले आहेत. धीरेंद्र शास्त्री यांच्या दुसऱ्या दाव्याबद्दल माहिती देताना श्याम मानव म्हणाले, "धीरेंद्र शास्त्री यांनी सांगितल्याप्रमाणे ते कोणाच्याही घरात जाऊन काहीही पाहून येऊ शकतात. त्या पद्धतीने त्यांनी पत्रकार संघाच्या शेजारच्या खोलीत १० वस्तू ठेवल्या जातील, त्या त्यांनी ओळखून दाखवाव्यात. या दोन्ही प्रकारात जर धीरेंद्र शास्त्री यांनी ९० टक्के अचूक उत्तर दिल्यास त्यांनी दिव्यशक्तीचे आव्हान जिंकले आहे, असा त्याचा अर्थ होईल. मग आम्हीही मानू की त्यांच्या दिव्यशक्ती आहे.श्याम मानव पुढे म्हणाले की, पण धीरेंद्र शास्त्री हे आव्हान स्वीकारत नसतील. पत्रकारांसमोर येणार नसतील तर ते दिव्यशक्तीच्या नावाखाली लोकांची फसवणूक करतात, लोकांच्या अंधश्रद्धेचा फायदा घेऊन स्वतःचा लाभ करतात, असा जाहीर आरोप आम्ही त्यांच्यावर करतो.२०२३ मध्येही आपण धीरेंद्र शास्त्री यांना आव्हान दिले असल्याची आठवण श्याम मानव यांनी करून दिली. ते म्हणाले, १९ फेब्रुवारी २०२३ रोजी पोस्टाने पत्र पाठवून त्यांना आव्हान दिले होते. तेच आव्हान आम्ही त्यांना पुन्हा देत आहोत. त्यावेळी आव्हानाची रक्कम ३० लाख रुपये होती. आता ती वाढवून आम्ही ८० लाख रुपये करत आहोत.

# कल्याण-डोंबिवलीत पावसाळ्यापूर्वी नालेसफाईला वेग

## 'अ' प्रभागात कामांची सुरुवात; तुटलेल्या गटारांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

जन सम्राट टाईम्स

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिकाच्या 'अ' प्रभाग क्षेत्रात पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नालेसफाईच्या कामांना सुरुवात करण्यात आली आहे. मात्र, परिसरातील तुटलेले, मोडकळीस आलेले आणि तुंबलेले नाले व गटारे यामुळे नागरिकांमध्ये गंभीर चिंता व्यक्त होत आहे.

**राजवटीत विकासकामांना खीळ**
२०१५ नंतर अपेक्षित असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २०२० मध्ये होणे अपेक्षित होते. मात्र कोरोना परिस्थितीमुळे निवडणुका लांबल्या आणि २०२० ते २०२६ या कालावधीत प्रशासकीय राजवट राहिली. या काळात अनेक विकासकामे अर्धवट राहिली असल्याचे चित्र आहे. नगरसेवक निधी उपलब्ध नसल्यामुळे विशेषतः गटारे आणि नाल्यांच्या बांधकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर त्रुटी दिसून येत आहेत.

**अनेक भागांत गटारांची दयनीय अवस्था**
अटाळी, आंबिवली, वडवली, मोहने, पंचशील नगर, जेतवन नगर, महात्मा फुले नगर, उंभर्णी, बल्यानी, टिटवाळा या भागांमध्ये गटारे आणि नाल्यांची अवस्था



अत्यंत खराब झाली आहे. अनेक ठिकाणी गटारे तुटलेली असून काही ठिकाणी बांधकामच झालेले नाही. विशेषतः बल्यानी परिसरात दरवर्षी पावसाळ्यात गटारांचे पाणी घरात घुसून नुकसान होत असल्याचे समोर येते.

**केवळ नालेसफाई पुरेशी नाही**
सध्या नालेसफाईची कामे सुरू असली तरी तुटलेल्या गटारांचे काय, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. केवळ गाळ काढून प्रश्न सुटणार नाही, तर जीर्ण झालेल्या गटारांची तातडीने दुरुस्ती किंवा नव्याने बांधकाम करणे अत्यावश्यक असल्याचे स्थानिकांचे मत आहे. तुटलेल्या गटारांमुळे साचलेले पाणी, दुर्गंधी आणि अस्वच्छता यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर पावसाळ्यात घाण पाणी घरात शिरल्यास मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होऊ शकते

**नागरिकांची जोरदार मागणी**
नागरिकांनी प्रशासनाकडे तातडीने निधी मंजूर करून गटारांची दुरुस्ती व नवीन बांधकाम हाती घेण्याची मागणी केली आहे. जलनिस्सारण व्यवस्थेचा संपूर्ण आढावा घेऊन कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**निष्कर्ष:** पावसाळा तोंडावर असताना केवळ नालेसफाई करून चालणार नाही. कल्याण डोंबिवली महानगरपालिका प्रशासनाने संपूर्ण जलनिस्सारण यंत्रणा दुरुस्त करून नागरिकांना दिलासा देणे ही काळाची गरज आहे.

# एरंडोलमध्ये बुद्ध जयंती समितीची बैठक उत्साहात संपन्न

## सुमित उर्फ लकी भाऊ शिंदे यांची अध्यक्षपदी सर्वानुमते निवड

जन सम्राट टाईम्स

**एरंडोल** | प्रतिनिधी |
विश्वाला शांती, करुणा, समता आणि मानवतेचा संदेश देणारे महामानव भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त एरंडोल शहरातील भीमनगर येथे बुद्ध जयंती समितीची बैठक बुधवार, दि. २९ एप्रिल रोजी अत्यंत उत्साहपूर्ण आणि मंगलमय वातावरणात पार पडली. बैठकीत सर्वानुमते सुमित उर्फ लकी भाऊ शिंदे यांची बुद्ध जयंती समितीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. तसेच उपाध्यक्षपदी बंटी सरदार, खजिनदारपदी रोहित गायकवाड तर कार्याध्यक्ष म्हणून सागर सरदार, सचिन बोरसे, आकाश इंगळे आणि उमेश बोरसे यांची निवड करण्यात आली. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रकाश शिंदे, नितीन बोरसे, उमेश भाऊ शिंदे, रवी बोरसे, अभिषेक शिंदे, संघरत्न गायकवाड, लखन बनसोडे, प्रवीण बाविस्कर, अमोल शिंदे, मनोज बोरसे, राहुल बोडरे, प्रवीण खैरनार, दिनेश बोरसे, मनोहर बोडरे, जितेंद्र बोडरे आदींसह मोठ्या संख्येने भीमसैनिक उपस्थित होते. उपस्थितांनी बुद्धांच्या विचारांचा समाजात



अधिकाधिक प्रसार करण्याचा निर्धार व्यक्त केला.बैठकीत बुद्ध जयंतीनिमित्त विविध सामाजिक व धम्म दानाचे कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले. त्यानुसार दि. १ मे रोजी सकाळी खीरदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, समाजात बंधुभाव आणि मानवतेची भावना वृद्धिंगत करण्याचा संदेश यातून दिला जाणार आहे. तसेच सायंकाळी ७ वाजता एरंडोल शहरातून भव्य बौद्ध शांती यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही यात्रा भगवान बुद्धांच्या शांती, करुणा आणि धम्माच्या विचारांचा संदेश जनमानसात पोहोचविणारी ठरणार आहे. यात्रेनंतर रात्री ९ वाजता सामूहिक भोजनाचा कार्यक्रम होणार आहे. "बहुजन हिताय, बहुजन सुखाय" या बुद्धांच्या विचारांना केंद्रस्थानी ठेवून सर्व कार्यक्रम शांततामय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पाडण्याचा निर्धार यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.

# कल्याण-डोंबिवलीत मोबाईल टॉवर कंपन्यांविरोधात आंदोलन !

## ललित पगारे यांचे उपोषण तिसऱ्या दिवशीही सुरू

जन सम्राट टाईम्स

**कल्याण** | प्रतिनिधी |
कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीत उभारण्यात आलेल्या मोबाईल टॉवर कंपन्यांकडून हजारो कोटी रुपयांची थकबाकी वसूल करण्याच्या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते ललित पगारे यांनी सुरू केलेले उपोषण तिसऱ्या दिवशीही सुरू असून आंदोलन अधिक तीव्र होत आहे.

**४,५०० हून अधिक टॉवर**
कर वसुली शून्य असल्याचा आरोप पगारे यांच्या आरोपानुसार, शहरात सुमारे ४५९१ मोबाईल टॉवर उभारण्यात आले आहेत. मात्र, या टॉवर कंपन्यांनी महानगरपालिकेला मालमत्ता कर किंवा इतर करांच्या माध्यमातून एक रुपयाही भरलेला नाही. त्यामुळे पालिकेच्या तिजोरीवर हजारो कोटी रुपयांचा बोजा निर्माण झाल्याचा दावा करण्यात येत आहे.

**मोठ्या कंपन्यांचा समावेश**
या थकबाकीत अनेक मोठ्या कंपन्यांचा समावेश असल्याचे सांगण्यात येत आहे.त्यामध्ये Indus Towers Limited, Reliance Communications, Loop Mobile यांसह इतर पायाभूत सुविधा कंपन्यांची नावे समोर येत असल्याचे पगारे यांनी नमूद केले.

**"सामान्यांवर कारवाई, कंपन्यांवर का नाही?"**
महानगरपालिका प्रशासनावर टीका करताना पगारे म्हणाले, "मोबाईल टॉवर कंपन्यांकडून एक रुपयाही वसूल करण्यात आलेला नाही, पण सामान्य नागरिकांकडून





किरकोळ थकबाकीसाठी मालमत्ता सील केल्या जातात, पाणीपुरवठा खंडित केला जातो.

**प्रशासनावर वाढता दबाव**
या आंदोलनामुळे स्थानिक प्रशासन आणि राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून नागरिकांमध्येही संतापाची भावना व्यक्त होत आहे. उपोषणकर्ते पगारे यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, थकबाकी वसुलीबाबत ठोस निर्णय होईपर्यंत आंदोलन मागे घेणार नाहीत.

**प्रशासनाची भूमिका अद्याप अस्पष्ट**
दरम्यान, कल्याण डोंबिवली महानगरपालिका प्रशासनाकडून या गंभीर आरोपांवर अद्याप अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. मात्र, वाढत्या जनदबावामुळे लवकरच याबाबत स्पष्ट भूमिका घ्यावी लागणार असल्याचे संकेत आहेत.

**निष्कर्ष:** मोबाईल टॉवर कंपन्यांकडून थकबाकी वसुलीचा मुद्दा आता गंभीर बनला असून, प्रशासनाने तातडीने पारदर्शक भूमिका घेत ठोस कारवाई करणे आवश्यक आहे. अन्यथा हे आंदोलन आणखी तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

---

जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईम्स | अँकर न्यूज | ज

# नीता वायकोळे यांना राष्ट्रीय 'पद्मश्री डॉ. मणीभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार 2026' प्रदान

## पुण्यात दिमाखदार सोहळा; सामाजिक कार्याचा गौरव, अकोल्याच्या शिरपेचात मानाचा तुरा

जन सम्राट टाईम्स

**अकोला** : सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय आणि निस्वार्थ कार्य करणाऱ्या अकोल्यातील प्रसिद्ध कार्यकर्त्या नीता यशवंत वायकोळे यांना 'पद्मश्री डॉ. मणीभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार २०२६' देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ. मणीभाई देसाई प्रतिष्ठान, नीति आयोग, एमएसएमई मंत्रालय आणि राष्ट्रसेवा समिती, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुण्यातील सावित्रीबाई फुले स्मारक सभागृह येथे २७ एप्रिल रोजी झालेल्या दिमाखदार



समारंभात ज्येष्ठ समाजसेवक डॉ. रविंद्र भोळे आणि खादी व ग्रामोद्योग मंत्री रविंद्र साठे यांच्या हस्ते सौ. वायकोळे यांना सन्मानित करण्यात आले. या वेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याचे कौतुक करत सामाजिक क्षेत्रातील योगदानाचा विशेष उल्लेख केला. सौ. वायकोळे या महाराष्ट्र लेवा पाटीदार महासंघाच्या महिला उपाध्यक्ष (विदर्भ विभाग) म्हणून कार्यरत आहेत. दिव्यांग सोशल फाउंडेशन च्या माध्यमातून त्यांनी दिव्यांगांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मोठे काम केले आहे. तसेच रॉबिन हूड आर्मी या आंतरराष्ट्रीय संस्थेद्वारे अन्नदान, वस्त्रदान आणि अनाथ मुलांच्या शिक्षणासाठी (ज्ञानदान) त्यांनी सातत्याने पुढाकार घेतला आहे. जळगाव जिल्ह्यातील वरणगाव हे त्यांचे मूळ गाव असून अकोला व जळगाव जिल्ह्यातील अनेक सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असतो. कुटुंबाच्या साथीत उभा राहिलेला समाजसेवेचा प्रवास पुरस्कार स्वीकारताना मनोगत व्यक्त करताना नीता वायकोळे भावूक झाल्या. त्यांनी आपल्या यशाचे श्रेय कुटुंबीयांना देत पती यशवंत वायकोळे, मुलगा कुशल वायकोळे, सून उर्मी वायकोळे, मुलगी राजश्री बऱ्हाटे, जावई गिरीश बऱ्हाटे, भाची अमृता पाटील आणि पुतण जावई डॉ. दिपक लोखंडे यांचे विशेष आभार मानले. कुटुंबाच्या खंबीर पाठिंब्यामुळेच समाजसेवेचा हा मार्ग चालता आला," असे त्यांनी नमूद केले.

### सहकाऱ्यांचेही मान्यतापूर्वक आभार

यावेळी त्यांनी डॉ. विशाल कोरडे तसेच रॉबिन हूड आर्मी अकोला टीमचेही विशेष आभार मानले. त्यांच्या सहकार्यामुळेच विविध सामाजिक उपक्रम यशस्वीपणे राबवता आले, असे त्यांनी सांगितले.